# MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING HELD IN RESPECT OF PROPOSED EXPANSION OF SUGAR CRUSHING FROM 7500 TCD TO 12000 TCD IN RESPECT OF M/S. JAWAHAR SHETKARI SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD., AT SHRI KALLAAPPANNA AWADE NAGAR, HUPARI-YALGUD, TAL: HATKANANGALE, DIST. KOLHAPUR, MAHARASHATRA STATE.

M/s. Jawahar Shetkari Sahakari Sakhar Karkhand Ltd., Shri Kallappanna Awade Nagar, Hupari Yalgud, Tal: Hatkanangale, Dist: Kolhapur has submitted the proposal to the Maharashtra Pollution Control Board for public hearing for their proposed expansaion of sugar crushing from 7500 to 12000 TCD. In this regard, M.P.C. Board has conducted the environmental public hearing of the proposed project on 10-07-2015 at 11:30 A.M. at the factory site of M/s. Jawahar S.S.S.K. Ltd., at Shri Kallappanna Awade Nagar, Hupari Yalgud, Tal: Hatkanangale, Dist: Kolhapur. The following panel members were present for conducting the public hearing:-

1. Hon'ble Mrs. Sangita Chougule. - Chairperson
   Additional District Magistrate, Kolhapur.
   (Representative of District Collector, Kolhapur)

2. Shri M.S. Holkar - Convener
   Sub Regional Officer, MPCB,
   Kolhapur

First of all, Mr. M.S. Holkar, Convener has welcomed all and asked for the permission of Hon'ble Chairman to start the public hearing. After grant of permission from Hon'ble Chairman, convener had started the public hearing. The convener, had informed that, as per the Government Resolution of Govt. of India S.O. 1533 dated 14th September, 2006, public hearing has become mandatory for the project listed in 'A' category projects which requires 'Environmental Clearance' from Ministry of Environment, India, New Delhi is required. M/s. Jawahar S.S.S.K. Ltd. has submitted the proposal to the Ministry of Environment and Forest, Government of India, New Delhi for public hearing for their proposed expansaion of sugar crushing from 7500 to 12000. After that, MOEF has sanctioned TOR with certain terms and conditions and asked to prepare draft Environment Impact Assessment report (EIA), accordingly, industry has prepared the draft EIA report and submitted to Maharashtra Pollution Control Board. Then, Hon'ble District Collector, Kolhapur has declared the date to conduct public hearing on 10/07/2015.

M.P.C Board has published Notice in local newspaper prior to one month before the public hearing in Marathi newspaper daily "Dainik Pudhari" and in English news paper "The Times of India" on 09/06/2015. Hon'ble District Collector, Kolhapur has nominated his representative Mrs. Sangita Chougule, Additional District Magistrate as Chairperson of the public hearing panel. The

copies of EIA report and executive summary were made available for inspection at office of District Collector, Kolhapur ; District Industries Center, Kolhapur, Zilla Parishad Office, Kolhapur ; Environment Department, Govt. Of Maharashtra, New Adm. Bldg., 15th Floor, Madam Kama Marg, Mantralaya, Mumbai – 400 032 ; Member Secretary, M.P.C. Board, Kalpataru Point, 3rd floor, Opp. Cine planet, Sion Circle, Sion (E), Mumbai-32. ; Regional Office, MPC Board, Udyog Bhavan, Kolhapur; Sarpanch, Grampanchayat, Yalgud; Sarpanch, Grampanchayat, Hupari; Sarpanch, Grampanchayat, Rendal; Tahasil Office, Tal: Hatkanangale and BDO Office, Tal: Hatkanangale.

The convener further informed that, the purpose of this public hearing was to give information about the said proposed project to local people, and its impact on Environment and proposed measures to be taken, also to take note of complaints and objections of the people and grant opportunity to every person present at the venue to seek information or clarification on the project from the applicant. This Public Hearing panel will record the suggestions, complaints and objections of the people and submit the minutes of this Public Hearing to the government. This panel will not take any decision regarding the project. Then the convener invited representative/technical adviser of the project proponent to give detailed presentation of the proposed project to the public.

The Chairperson of the public hearing instructed the people to raise questions, objections, suggestions etc. from environmental point of view only. She instructed the technical consultant of the proposed project to give the presentation.

Thereafter, Shri Chougule, Technical Consultant presented the information to the public through slide show.

The present cane crushing capacity of Jawahar Shetkari Sahakari Sakhar Karkhana Ltd., Hupari, Shri Kallappanna Awadenagar, Hupari-Yalgud, Tal.: Hatkanagale, Dist: Kolhapur is 7500 TCD alongwith incidental co-generation project of 27.5 MW. The Board of Directors have taken a decision to enhance the cane crushing capacity from 7500 TCD to 12000 TCD. In this connection, No objection certificate is required to be obtained from the Ministry of Environment & Forest, Government of India, New Delhi. Accordingly, the public hearing is being conducted by the Maharashtra Pollution Control Board.

**Technical Details of the Project –**

Present requirement of raw material (Sugarcane) – 225000 M.T./month, Lime – 377 M.T./month, Sulphur – 96 M.T./month, Caustic Soda – 0.5 M.T./month. The proposed project will require raw material (Sugarcane) – 135000 M.T./month, Lime 216 M.T./month, Sulphur – 42.36 M.T./month, Caustic Soda – 1.00 M.T./month. The main product will be sugar and electricity while the bye-product will be molasses, bagasse & pressmud.

**Present Condition of Environment –**

**Air :** The ratio of pollution increases due to traffic of vehicles, venting of gasses from chimney, construction etc. On inspection, the air samples in an about the

factory premises are within the prescribed limits of Maharashtra Pollution Control Board.

**Noise :** The general survey of the working place, project area, schools & health care centers shows that the sound / noise is within permissible limits.

**Water :** The samples of the water on the surface and underground are found good for drinking & agricultural use.

**Land :** The land under the survey is fertile & irrigated and the water table level is 30 to 35 meter.

**Biological Environment :** The survey with regard to bio-diversity was conducted.

The environmental impact of the present situation and in post project period.

**Air :** During the establishment of the project the intensity of the traffic increases and it affects the environment due to construction equipments. Mainly, the air pollutes due to the mixing of the various gases from the boilers in the air. **Provisions** – pollution of dust will be checked by spraying water and by regular maintenance of vehicles.

**Noise :** The sound pollution is due to traffic of vehicles and construction machinery which is permissible up to 85-90 decibels. **Provisions** – Helmet and ear plug.

**Water :** Toilets of good quality are constructed for workers and constructed Nullahs will be built to check the rain water and prevent water pollution.

**Land :** Preparatory activities like construction of access roads, temporary office, godowns will be confined during the period of commissioning the project. Mostly the land is plain and no forest land involves in the project. The soil will not be eroded in the rain as suitable Nullahs are constructed to check the flood of the water.

**Waste water generation:** The total waste water generation form project will be 750 $M^3$/day and the waste water will be treated at ETP and the treated water will be used fu. the green belt.

**Ash** : The ash emitted from boiler will be used for land filling and composting.

**Impact on Ecology** : The project is far away from the reserve forest area, therefore no significant impact on ecology.

**Green belt :** Project having total area of 10,07,648.40 Sq.meter and 33% of the area i.e. 4,16,944 sq.meter will be utilized for green belt in which local species of vegetation will be planted.

The height of the chimney stack is as per the norms of Indian Emission Regulations and the contents of the emitted dust will be tested regularly in terms of quality and quantity.

In future, the facility for daily inspection of temperature, humidity, wind direction, speed, rainfall etc. would be made available.

Under disaster management, the inflammables will be kept under due protection and will be handled carefully and shall not be stocked over the limit.

There will be a positive socio-economic development in the region such as, new roads, water and health facility, educational facility, Banking, Medical etc.

**Environmental Management** :

**Air Management :** The stack emission should be less than 100 mg/ $NM^3$ and stack height should be 70 meter.

**Noise Management :** The design features of machinery shall be provided to ensure low noise levels in the working areas by use of noise pollution control equipment. Green belt will be developed to reduce noise.

**Waste Water Management :** Waste water generated from karkhana shall be treated in our ETP.
Rain water harvesting system shall be adopted for store the water and the same shall be recycled for future. Health and security facilities shall be provided in and around the area of karkhana. Green belt will be developed on 33 % of the project area.

The potential environmental impacts of the proposed project will be negligible. On the contrary, a great deal of social economic and educational development will be brought about and ample employment will be generated.

After presentation of the above project, the chairperson of the public hearing appealed the public for suggestions, questions, objections, complaints & opinions etc.

Thereafter the following questions and answers are raised.

**Q.No.1] Shri Rejendra Sutar, Dy. sarpanch, Hupari, Tal.: Hatkanangale, Dist. Kolhapur.**

Which precautionery measures are taken to reduce the fly ash emission due to proposed expansion ?

Ans. : At this, the technical consultant of the karkhana replied that, karkhana has provided wet scrubber system to minimize the suspended particle matters from the stack. For the proposed project, the karkhana will provide ESP system. The norms of emission of MPCB & CPCB are less than 150 mg/$M^3$. From the proposed project the emission of SPM will be below 100 mg/$M^3$.

Q.No.2] **Shri Subhash Annaso Gotkhinde, Dy. Sarpanch, Yalgud, Tal.: Hatkanangale, Dist: Kolhapur.**

Which precautionery measures are taken to prevent the bagasse stored by the factory which fly towards panand way side ?

Ans. The technical consultant said that the karkhana has developed green belt and taking precautions to arrest the flying bagasse.

Shri Subhash Gotkhinde further asked whether the karkhana will provide excessive treated waste water out of 450 m3 after using it for the green belt for their crop land of 60 acres which is adjacent to the karkhana land ?

Karkhana consultant said that MPCB grants consent with a condition that there shall be zero discharge of effluent. Hence, we cannot discharge indusitrial effluent outside the factory premises. For that purpose, development of green belt of 33% of total plot area is mandatory. Hence, after treatment the waste water of about 4,50,000 litres generated in the process will be utilized on green belt area of 4,16,944 square meter and if MPCB permits, the remaining water will be provided to karkhana members.

Shri Subhash Gotkhinde further said that, the prices of chemical fertilizer have increased immensely. Hence, will the karkhana provide us phospho-compost manure, the production of which will be increased due to the capacity expansion of the factory. On this, the karkhana consultant answered that the manure will be provided taking into consideration its production and demand of the farmers.

Then Shri Subhash Gotkhinde requested that the karkhana should provide physical facilities like primary and secondary education to the people in this area. On this, Mr. Manohar Joshi, Managing Director of the factory said that, there are schools and colleges of Government, private institutions, Rayat Shikshan Sanstha as well as the promoters of karkhana. Hence, it is not necessary to provide such facilities separately. Secondly under the Government educational scheme, children of cane harvesters/migrants are being provided schooling continuously for last 15 years and your points will be put up before the management.

After that, Shri Gotkhinde demanded that the karkhana should provide the facility of banking and ATM. On this Shri Joshi said that, the karkhana is having 1400 workers, 21000 sugarcane producers and the area of operation of karkhana comprises of 220 villages from the State of Maharashtra and Karnataka. All the payments to these people are made in the respective bank as per their demand. Therefore, there is no need of bank and ATM facility. The Branches of various banks are also available at Hupari, Rendal, Yalgud.

After Shri Gotkhinde asked which remedial measures are provided for flying ash towards panand way. On this, Shri Joshi said that, the

management have taken due precaution for the stack emission and maintained minimum emission of ash from the beginning. The factory has obtained permission from Central Government for the proposed project and duly applied to MPCB for their permission. He further said that, we have provided Wet Scrubber for last 15 years and in the proposed project, ESP will be provided. In addition to this, the remaining about 1.00 to 1.25% of the ash would be used for compost manures and the same would be sold at minimum price. The compost from pressmud, ash, solid waste has been being given to agriculture for last 4 to 5 years and a great deal of response is received. The quality of the compost manure is good. The ash is also used for filling up stone quarries after using for composting. Due precaution of the fly ash will be taken in view of the expanded capacity.

Shri Gotkhinde further asked why the karkhana is not producing ethanol and undertaking expansion of Co-Generation, in the wake of falling sugar prices. On this, Shri Monohar Joshi said that, at present sugar industry is passing through critical conditions. There is big gap between the sugar rates in market and FRP price fixed for sugarcane by the Government. In past, sugar Industry had never faced this type of acute crisis. The liabilities of farmers are around Rs. 20,000 cores. Due to International competition, over-production of sugar in country, sugarcane prices and low sugar prices, severe financial crisis in sugar industry are being faced. Our karkhana is run on the co-operative basis. The future is also blurred. If karkhana is not having capital base, no banker would advance loans. If the factory earns profit or receives deposits from members, the management will consider the said projects.

At present, there is recession and the market is not favourable. Hence, the suggestion may be considered in future.

At this time, the chairperson of the public hearing appealed to ask questions regarding environmental problems only arising in future and the other issues about the management shall be discussed separately.

Then, Shri Gotkhinde concluded his speech by giving best wishes to the proposed project.

**Q. No.3] Shri V. Sunanda Reddy, Environmentlist, Hyderabad.**

Firstly, I congratulate management of M/s. Jawahar SSSK Ltd. Generally environmentalists oppose the industry. But my suggestion is industry is essential for society. Because the population of India has gone 125 crores and we have to give employment, industrial growth. At the same time we maintain the ecological balance and environment. I am giving few suggestions to maintain ecological balance and environment. Firstly I whole heartedly support the industry. My special request to the consultancy you have conducted EIA of water and land is very good. I am also requesting management to give extra funds to survey of health status of the 10 Km radius. It is useful in future and also ground water status, land quality. We are using chemical fertilizer very highly. It is extra work for consultancy but and it is very useful for environment. Your usage for

water is 750 KLD. For one acre sugarcane need 3 crore litres of water. My request to management is to promote the farmers to minimize the utilization of water. If you promote drip irrigation or sprinkler to reduce it will use water below 1 crore litres. Your demand for sugarcane is almost 675000. As per my calculation it uses almost 15 TMC water. For drip irrigation it takes 3 TMC water. Water is very limited resource. The remaining water is useful for nature, farmer and society. Please consider my proposal. It is very useful for promoting farmers. Whatever CSR is there cooperate the farmers. Also my request is to discourage the farmers to utilize the chemical fertilizer. Compost is useful replace for the chemical fertilizer. Give it at subsidy price. Supply it to the farmers. It is very safe for the society. 33% plantation is made mandatory by government. But my suggestion is you should go to 50 or 60 % plantation because of increase of the population. It is very necessary to control the pollution. In this also take up the fruit bearing plants. It is useful to society. I observed you have planted mango and coconut trees. I specially appreciate you. Please add another fruit bearing plants. I also request you whatever expending for CSR purpose please form a coordination committee and spend the money in demand oriented works and not in target oriented works. It is very useful for the society and villages. I also request you to provide skill development programmes. In India skill development is very low. It is below 5 to 6%. Please consider skill development activity in your CSR project. You collect water from Dudhganga river. Our environment is in zone II and highly flowing river. Store the water. It is useful to maintain the ecological balance. My all the suggestions are not highly burden to you and for the sake of people and society. Please cooperate people.

On this, Shri N. H. Shivangi, Regional Officer, Maharashtra Pollution Control Board requested Shri. Reddy to give his representation in writing.

Ans. On this, the project consultant said that, we have studied the area around 10 k.m. of radius of karkhana site. Also, we have studied the impact on health. We have analyzed the ground water and soil. We always create awareness among farmers. During cane development programmes, we always appeal farmers for minimum use of water and chemical fertilizers and promote use of compost manure. Mainly, we extend guidance about the varieties of sugarcane to be planted to get more weight and suggest for fertilizers and also support drip irrigation to save water. Every Corporate sector, Public sector, Private sector, Proprietary and Multi nationals have different roles under Social Corporate Respobilities. Ours is a co-operative sugar industry and would carry out the related responsibilities. The karkhana would give written answers to the suggestions made in writing.

**Q.No.4] Shri Vilas Babaso Khanvilkar Ex. Z.P. Member, Rendal, Tal.: Hatkanangale, Dist.: Kolhapur.**

No pollution has been observed, when the karkhana was running with 7500 TCD. As the factory management has taken proper care/precautions, there will not be any increase in the level of pollution

after proposed expansion of 12000 TCD. Therefore, the proposed project must come in to being.

**Q.No.5] Shri Vasant Ramchandra Shinde, Member of Grampanchayat, Yalgud, Tal; Hatkanangale, Dist: Kolhapur**

There is a nalla to the west side of the factory and there is drinking water well, borewell on the bank of the nalla. In every rainy season, the waste water of karkhana meets the nalla and the water from the wells gets polluted. What precautionary measures can be taken to avoid it ?

Ans. On this, the project consultant said that, mainly, waste water discharged from karkhana is treated in the ETP and the treated water is used for the green belt. You say that the waste water mixes in nalla during June to September in rainy season. During this period the factory is not operational. It is the off season for the factory. Its operation starts in the month of October and closes in the month of May. Hence, there is no possibility of water to going out of the factory premises. However, if unfortunately this has happened, the karkhana would take due precaution in future.

Thereafter, Shri Shivangi, Regional Officer requested the people, if any more questions, problems they intend to file or submit, they can give in writing to Sub-Regional Office, Kolhapur up to 11.7.2015. The, he read in brief the questions and answers taken place during the public hearing. He further said that, today's discussion will be taken in the minutes and MPCB shall submit the same to the Ministry of Environment & Forest, Government of India along with CD of the public hearing. MPCB has not given any permission to the proposed project and the permission will be granted after certification by the Ministry of Environment & Forest, Govt. of India.

At last, the Hon'ble chairperson Mrs. Sangita Chougule said that, the suggestions, questions, objections raised in the public hearing will be recorded in the minutes and the State Government shall submit the same to the Central Government. After that, she declared the public hearing concluded after giving vote of thanks.

In view of the proposed project, the copies of written complaint submitted by Shri Suresh Dattu Hanabar, Yalgud; resolutions passed by Grampanchayat, Hupari; Grampanchayat, Yalgud; and Grampanchayat, Rendal in support of the proposed project, and also representation received from Shri. V. Sunanda Reddy, Environmentalist and reply to above complaints/representations submitted by the factory is also enclosed along with the minutes.

| | |
|---|---|
| **(Manish Holkar)** | **(Sangita Chougule)** |
| Convener | Chairperson |
| Sub Regional Officer, MPC Board | Additional District Magistrate, |
| Kolhapur | Kolhapur |

**मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., कल्लाप्पाण्णा आवाडे नगर, हुपरी, यळगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता ७५०० टी.सी.डी. पासून १२००० टी.सी.डी. करणेच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., कल्लाप्पाण्णा आवाडे नगर, हुपरी, यळगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता ७५०० टी.सी.डी. पासून १२००० टी.सी.डी. करणेच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी दि. १०.०७.२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., कारखाना स्थळ, कामगार भवन स्थळ येथे आयोजित करण्यात आली. सदर जाहीर जनसुनावणीस खालीलप्रमाणे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

1. सौ. संगीता चौगुले, - अध्यक्ष
   अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, कोल्हापूर
   (मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे प्रतिनिधी)

2. श्री. मनिष होळकर,
   उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, - संयोजक
   कोल्हापूर

सुरुवातीस जनसुनावणीचे संयोजक श्री. मनिष होळकर, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या मान्यतेने जनसुनावणीस सुरुवात केली. यावेळी त्यांनी सांगितले की, आजची जाहिर जनसुनावणी ही भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्प कॅटेगरी 'अ' मध्ये येत असल्याने आजची जाहिर जनसुनावणी घेण्यात येत आहे. मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., यांनी त्यांची सध्याची ऊस गाळप क्षमता ७५०० टी.सी.डी. पासून १२००० टी.सी.डी. प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी सदर कारखान्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला होता. पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी कारखाना व्यवस्थापनास काही अटी व शर्ती घालून टी.ओ.आर. मंजूर केला व प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास अनुमती दिली. त्यानुसार कारखाना व्यवस्थापनाने पर्यावरण मुल्यांकन अहवाल तयार केलेला असून तो शासनास सादर केलेला आहे. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी आज ही जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली.

सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर दै. 'पुढारी' या मराठी वर्तमानपत्रामध्ये व दै. 'टाईम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये दि. ०९.०६.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. मा. जिल्हाधिकारी यांनी आजच्या जनसुनावणीसाठी त्यांचे प्रतिनिधी म्हणुन मा. संगीता चौगुले, उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची नियुक्ती केलेली आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी तयार केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय मुंबई व प्रादेशिक कार्यालय कोल्हापूर, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, यळगुड, हुपरी, रेंदाळ तसेच तहसिलदार, गट विकास अधिकारी यांचे कार्यालय इ. ठिकाणी जनतेच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या व प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनतेच्या जर काही सूचना, तक्रारी, आक्षेप, टिका टिप्पणी असतील तर त्या लेखी स्वरुपात देण्यास सांगितले होते. आपल्या जर काही सूचना, तक्रारी असतील तर आपण त्या जनसुनावणी दरम्यानही देवू शकता. त्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेतली जाईल. या जनसुनावणीचा उद्देश प्रस्तावित प्रकल्पाबद्दल जनतेस माहिती देणे, त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होईल, केलेली उपाययोजना याबद्दल माहिती देणे, जनतेच्या आक्षेपांची नोंद घेणे हा आहे. ही जनसुनावणी समिती केवळ पर्यावरणाच्या दृष्टीने जनतेच्या तक्रारी, आक्षेप यांची नोंद घेणार असून प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय ही समिती घेत नाही. यानंतर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील त्यानंतर उपस्थितांनी आपले संपूर्ण नाव, गाव सांगुन लेखी अथवा तोंडी हरकती/तक्रारी, सूचना मांडाव्यात असे सांगितले.

यावेळी जाहीर जनसुनावणीच्या अध्यक्षा मा. संगीता चौगुले यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत केवळ पर्यावरणाच्या दृष्टीने प्रश्न, सूचना मांडाव्यात अशी सूचना केली. तसेच प्रकल्पामुळे जनमानसावर, पर्यावरणावर दुरगामी परिणाम होणार असतील तर त्याबाबत उपस्थितांनी आपल्या हरकती/तक्रारी, सूचना मांडाव्यात असे सांगुन प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागारांना प्रकल्पाविषयीची माहिती सादर करण्याची सूचना केली.

यानंतर कारखान्याचे तांत्रिक सल्लागार श्री. चौगुले यांनी स्लाईड शो व्दारे प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालीलप्रमाणे माहिती दिली.

मे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., कल्लाप्पाण्णा आवाडे नगर, हुपरी, यळगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांची सध्याची ऊस गाळप क्षमता ७५०० टी.सी.डी. आहे

तसेच २७.५ मेगा वॅट विज निर्मिती क्षमतेचा सहवीज प्रकल्प चालू आहे. कारखान्याची सध्याची ऊस गाळप क्षमता ३५०० टी.सी.डी. पासून १०००० टी.सी.डी. करणेचे संचालक मंडळाने निश्चित केले आहे. त्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून पर्यावरण ना हरकत दाखला घेणे आवश्यक आहे. त्यानुसार कारखान्याने पर्यावरण व वने मंत्रालय यांच्याकडे अर्ज केलेला आहे. त्यानुसार म.प्र.नि. मंडळ आज पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेत आहे.

**प्रकल्पाची तांत्रीक माहिती –**

सध्या कच्च्या मालाची गरज - २२५००० मे.टन. प्रतिमहिना ऊस, चुनकळी – २७७ मे.ट. प्रति महिना, सल्फर १६ मे.टन. प्रति महिना, कॉस्टीक सोडा ७.५ मे.ट. प्रति महिना असुन प्रस्तावित प्रकल्पासाठी कच्च्या मालाची गरज - ३२५००० मे.टन. प्रतिमहिना ऊस, चुनकळी – २१६ मे.ट. प्रति महिना, सल्फर ४२.३६ मे.टन. प्रति महिना, कॉस्टीक सोडा १० मे.ट. प्रति महिना असेल. मुख्य उत्पादने साखर, वीज असुन सह उत्पादने मोलॅसिस, ऊस भुसा, मळी हे आहे.

**पर्यावरणीय सद्यस्थिती –**

हवा : वाहनांची ये जा, औद्योगिक धुरांड्यातुन बाहेर पडणारे वायु, धुलिकण व मुख्य प्रदुषणाचे प्रमाण जाणवत असते. कारखाना परिसरातील हवेचे नमुने तपासले असता ते म.प्र.नि. मंडळाच्या मानकांच्या आत आहे.

**ध्वनी** : कामाची जागा, प्रकल्प क्षेत्र, शाळा, वैद्यकिय जागा येथे सर्वेक्षण केले असता ध्वनी मर्यादित आहे असे आढळले.

**पाणी** : भूपृष्ठ व जमिनीतील पाण्याचे नमुने पिण्यासाठी व शेतीसाठी योग्य आहेत.

**जमीन** : अभ्यास क्षेत्रातील सर्व जमिन सुपिक व बागायत आहे. भुजलाची पातळी ३० ते ३५ मिटरवर आहे.

**जैविक पर्यावरण** : प्रकल्पा पासुन १० कि.मी. क्षेत्रामध्ये जैव विविधता सर्वेक्षण करण्यात आले.

**प्रकल्प उभारणी आणि चालू काळातील पर्यावरण आघात तपशिल –**

हवा : उभारणी काळात वाहनांची ये जा वाढल्याने बांधणी उपकरणामुळे हवेवर परिणाम होतो. प्रकल्प चालू असताना मुख्यत: वाफ संयत्रामधुन वेगवेगळे वायु हवेत मिसळल्याने हवा दुषित होते. उपाययोजना – हवेत उडणारी धुळ पाणी फवारणी करुन तसेच वाहने चांगली ठेवून व त्यांची देखभाल करुन थांबविता येते.

**ध्वनी** : वाहने व बॉयलर्ससाठी लागणारी साधने यांच्यामुळे ध्वनी प्रदुषण होते त्याची आवाजाची मर्यादा ८५ ते ९० डेसिबल पर्यंत असेल. उपाययोजना – सुरक्षा टोपी, इअर प्लगचा वापर इ.

**पाणी** : कामगारासाठी चांगल्या प्रतिची प्रसाधन गृहे बांधुन दिली आहेत तसेच पावसाच्या पाण्यासाठी नाल्याची बांधणी करुन पाणी प्रदुषण थांबवले जाईल.

**जमीन** : प्रकल्प उभारणी वेळी जमीन सपाटीकरण, तात्पुरती कार्यालये, गोदाने यामुळे थोडसा परिणाम दिसून येईल. जमीन बहुदा सपाट आहे. पावसामुळे वाहणाऱ्या नाल्यांची योग्य व्यवस्था असल्यामुळे माती विदारण होत नाही.

**दुर्षीत पाणी निर्मिती** – प्रकल्पाच्या प्रक्रियेतून प्रतिदिन ७५० घनमिटर एवढे सांडपाणी निर्माण होईल व त्यावर सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया करुन ते हरितपट्ट्यासाठी वापरले जाईल.

**राख** – बॉयलरमधून निघणारी राख जमीन सपाटीकरणासाठी तसेच खत म्हणून वापरली जाते.

**परिस्थितीकी परिणाम** – हा प्रकल्प आरक्षित वनापासून दूर असल्याने परिस्थितीकीय परिणाम होत नाही.

**हरीत पट्टा** – प्रकल्पाचे एकूण क्षेत्र ३३,०४,८६१ चौ.मि. आहे. त्यापैकी ३३ टक्के म्हणजेच १०,९०,६०४ चौ.मि. क्षेत्रावर हरीत पट्टा निर्माण केला आहे. त्यामध्ये स्थानिक वनस्पतींची निवड केली आहे.

भारतीय उत्सर्जन नियमावलीनुसार धुलीकन मर्यादा तसेच धुराड्याची उंची ठरविलेली आहे. धुलिकणांची संख्यात्मक आणि गुणात्मक चाचणी सतत केली जाते. भविष्यात तापमान, आद्रता, वाऱ्याची दिशा, गती, पर्जन्यमान इ. हवामान परिमाणे प्रतिदिन तपासण्याची सुविधा उपलब्ध करणार आहे.

आपत्ती व्यवस्थापनामध्ये ज्वालाग्राही पदार्थ सुरक्षित ठिकाणी ठेवले जातील व त्यांची वारंवार काळजी घेतली जाईल तसेच या पदार्थांचा प्रमाणापेक्षा जास्त साठा करणार नाही.

प्रकल्पामुळे भौतिक व सामाजिक विकास होईल जसे नविन रस्ते, पाणी आणि आरोग्य सुविधा, शैक्षणिक सुविधा, बँक सुविधा, वैद्यकीय सुविधा इ.

**पर्यावरण व्यवस्थापन**

**हवा व्यवस्थापन** – धुराड्यामधून निघणा-या धुलीकणांची संख्या १०० मि.ग्रॅ./घन मिटर पेक्षा कमी राहील तसेच धुराड्याची उंची ७० मिटर असेल.

**ध्वनी व्यवस्थापन** – प्रकल्पामध्ये कमीत कमी आवाज करणाऱ्या यंत्राचा वापर केला जाईल तसेच ध्वनी नियंत्रकाचा वापर केला जाईल. तसेच आवाजाची तिव्रता कमी करण्यासाठी हरीत पट्टा तयार केला जाईल.

**दुषीत पाणी व्यवस्थापन** – सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रकल्पातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाईल.

स्वच्छ पाणी भविष्यामध्ये वापरासाठी साठवले जाईल. आरोग्य सुविधा आणि सुरक्षा पुरवली जाईल तसेच एकुण प्रकल्पाच्या जागेपैकी ३३ टक्के जागेवर हरित पट्टा निर्माण केला जाईल.

या प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणार परिणाम नगण्य असून प्रकल्प क्षेत्रामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होईल.

वरील सादरीकरणानंतर जनसुनावणीच्या अध्यक्षा यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सुचना, प्रश्न, आक्षेप, तक्रारी, मते मांडावीत अशी सुचना केली. यानंतर खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली.

प्रश्न क्र. १. श्री. राजेंद्र सुतार, उप सरपंच, तुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

प्रस्तावित प्रकल्पाच्या वाढीव गाळप क्षमतेमुळे धुराड्यातून निघणाऱ्या राखेचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणती उपाय योजना करणार ते सांगावे ?

उत्तर -

यावेळी कारखान्याचे तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की, सध्यस्थितीत बॉयलर मधून निर्माण होणाऱ्या राखेचे प्रमाण कमीत कमी राखण्यासाठी कारखान्याने वेट स्क्रबर बसविलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये इ.एस.पी. यंत्रणा बसविणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अटी नुसार हवेतील राखेचे प्रमाण १५० mg/m3 इतके असले पाहिजे. प्रस्तावित प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या राखेचे प्रमाण १०० mg/m3 इतके कमी असेल.

प्रश्न क्र. २. श्री. सुभाष आण्णासो गोटखिंडे, उप सरपंच, पळगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

साखर कारखान्याचा साठविण्यात आलेला बगॅस वाऱ्यामुळे पाणंदीच्या बाजुने उडत जातो त्या संबंधात काय उपाययोजना केलेली आहे ?

उत्तर -

यावेळी कारखान्याचे तांत्रिक सल्लागारांनी सांगितले की, कारखान्याने हरित पट्टा विकसीत केलेला असून कारखान्याच्या बाहेर बगॅस जाणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. सुभाष गोटखिंडे यांनी कारखान्याच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रामधून प्रक्रियाकृत केलेले ४५० घनमिटर सांडपाणी हरित पट्टयासाठी वापरुन झालेनंतर कारखान्याला लागूनच आमच्या मालकीची ६० एकर जमिन आहे आहेत त्यामध्ये फळबाग लागवडीसाठी देणार का असे विचारले. कारखान्याच्या गट नंबरला लागूनच आमचा गट आहे. यावर कारखाना सल्लागारांनी सांगितले की, म.प्र.नि. मंडळ कारखान्याला संमतीपत्र देताना सांडपाण्याचा शून्य विसर्ग असला पाहिजे अशी अट घालते. त्यामुळे कारखाना हद्दीबाहेर सांडपाणी सोडता येत नाही. त्यासाठी ३३ टक्के हरितपट्टा निर्माण करण्याची अट असते. कारखान्यातून निघणाऱ्या ४,५०,००० लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी ४,२६,९४४ चौ. मिटर हरित पट्टयासाठी वापरले जाणार आहे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी दिली तर शिल्लक राहिलेले कारखाना सभासदांना देण्यास हरकत नाही.

यानंतर श्री. सुभाष गोटखिंडे यांनी रासायनिक खतांच्या किमती प्रचंड वाढलेल्या आहेत त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पात ऊस गाळप क्षमता वाढल्यामुळे जे मळीचे प्रमाण वाढणार आहे त्यापासून जास्त फॉस्फेट कंपोस्ट खत तयार होणार आहे ते आम्हाला देवून त्याचा जास्तीत जास्त फायदा शेतकऱ्यांना मिळणार का असे विचारले. यावर कारखाना सल्लागारांनी एकूण किती खत निर्माण होते व ते मागणारे शेतकरी किती आहेत त्या प्रमाणात दिले जाईल असे सांगितले.

यानंतर श्री. सुभाष गोटखिंडे यांनी कारखान्याने भागातील जनतेला भौतिक सुविधा यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा मिळाली पाहिजे अशी विनंती केली. यावर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. मनोहर जोशी यांनी रेंदाळ, हुपरी, पळगुड येथे शासनाच्या, खाजगी, रयत शिक्षण संस्था तसेच कारखाना प्रवर्तकांच्या शाळा कॉलेजची सुविधा आहेत त्यामुळे वेगळ्या सुविध्या देण्याची आवश्यकता नाही असे सांगितले. दुसरा मुद्दा कारखान्यावर जी तोडणी मजुरांची मुले आहेत त्यांच्यासाठी शासनाची जी शालेय योजना आहे ती गेली १५ वर्षे कारखान्यावर अव्याहतपणे चालू आहे, स्थलांतरांसाठी असणाऱ्या शासनाच्या योजना कारखान्यावर चालू आहेत व व्यवस्थापनासमोर आपला विषय मांडला जाईल असे सांगितले.

यानंतर श्री. गोटखिंडे यांनी कारखान्याने बँकींग सुविधा तसेच ए.टी.एम. सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केली. यावर श्री. जोशी यांनी कारखान्यामध्ये १४०० कामगार काम करतात, २१००० ऊस उत्पादक या कारखान्याला ऊस पुरवठा करतात तसेच कारखान्याच्या

कार्यक्षेत्रात महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील २२० गावांचा समावेश आहे या सर्वांचे पेमेंट त्यांनी सांगितलेल्या बँकेच्या शाखेत केले जाते त्यामुळे कारखान्याने बँकेची ए.टी.एम. सुरु करण्याची आवश्यक नाही असे सांगितले. हुपरी, रेंदाळ, यळगुड येथे प्रत्येक बँकांच्या शाखा आहे.

यानंतर श्री. गोटखिंडे यांनी कारखान्याची राख उडून पाणंदला जाते त्यावर काय उपाय योजना केली आहे असे विचारले.

यावर श्री. जोशी यांनी सांगितले की, कारखान्याच्या चिमनीमधून बाहेर पडणारी जी राख आहे तीचे प्रमाण पहिल्यापासूनच अत्यल्प ठेवण्याचा प्रयत्न कारखाना व्यवस्थापनाने केलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी केंद्र सरकारची परवानगी घेतली असून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे रितसर अर्ज सादर केलेला आहे. गेल्या १५ वर्षापासून वेट स्क्रबर तंत्रज्ञान आम्ही वापरत आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये ई.एस.पी. यंत्रणा वापरली जाणार आहे. या व्यतिरिक्त जी तयार झालेली एक ते सव्वा टक्के राख आहे त्यापासून कंपोस्ट खत तयार केले जाते. त्याची कमीत कमी दरात विक्री केली जाते. कारखान्यातून बाहेर पडणारा प्रेसमड, राख व खनिज पदार्थ या पासून कंपोस्ट करून गेली ४ ते ५ वर्ष ते शेतीसाठी दिला जातो त्यास सभासदांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. कारखान्याच्या खत निर्मिती प्रकल्पामध्ये तयार होणाऱ्या खताची प्रत चांगली आहे. नंतर शासनाची दगडी खाण मुजविण्यासाठी कारखान्याची राख वापरून राहिलेली राख खत निर्मिती करण्यासाठी वापरली जाते. वाढीव क्षमतेनुसार राखेची काळजी घेतली जाईल.

यानंतर श्री. गोटखिंडे यांनी मार्केट मध्ये साखरेचे भाव वाढले तर इथेनॉल किंवा को-जेन यांचे वाढीव उत्पादन का घेतली नाही असे विचारले. यावर श्री. मनोहर जोशी यांनी सांगितले की, सध्या साखर कारखानदारी अतिशय बीकट परिस्थतीतून जात आहे. भारतात असलेले साखरेचे भाव आणि शासनाने निश्चित केलेले ऊसाचे दर यामध्ये अत्यंत मोठी तफावत आहे. पुर्वी साखर कारखानदारी इतक्या अडचणीत आलेली नव्हती. २०००० कोटी रुपये शेतकऱ्यांचे देणे आहेत. आंतरराष्ट्रीय स्पर्धा, देशात झालेले उत्पादन इ. मुळे ऊसाची किंमत जास्त व साखरेचे भाव कमी यामुळे साखर उद्योगाचे अर्थगणित चुकलेले आहे. आपला कारखाना सहकारी तत्वावर चालतो. येणारा भविष्यकाळ सुध्दा व्यस्त जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारखान्याकडे भांडवल नसेल तर बँक कर्ज देत नाही. ज्यावेळी या धंद्यात थोडा नफा मिळेल किंवा सभासदांनी ठेवी जमा केल्या तर असा प्रकल्प हाती घेण्याचा व्यवस्थापनाचा मानस आहे. सध्या मंदी आहे, बाजार परिस्थीती अनुकूल नाही. भविष्यात आपल्या सुचनांचा विचार करु.

यावेळी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीच्या मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांनी केवळ पर्यावरण विषयक समस्या भविष्यात उद्भवू शकणार असतील तर त्याबाबत प्रश्न मांडावेत व जर इतर व्यवस्थापनासंदर्भात मुद्दे असतील तर त्याबाबत त्यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा करावी असे सांगितले.

यानंतर श्री. गोटखिंडे यांनी प्रस्तावित प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

**प्रश्न क्र. ३. श्री. डॉ. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी -**

यावेळी श्री. रेड्डी यांनी प्रस्तावित प्रकल्पाबद्दल कारखाना व्यवस्थापनाचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, सामान्यपणे पर्यावरणवादी उद्योगांना विरोध करत असतात. माझ्या मते उद्योग हे समाजासाठी आवश्यक असतात. सध्या भारताची लोकसंख्या वाढलेली आहे. त्यामुळे लोकांना नोकरी मिळाली व विकास झाला पाहिजे. तसेच आपल्याला पर्यावरणाचा समतोलसुध्दा राखायचा आहे. त्या दृष्टीने मला काही सूचना करावयाच्या आहेत. माझा आपल्या उद्योगास पाठींबा आहे. पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण मुल्यांकन अहवाल चांगला बनविलेला आहे. माझी विनंती आहे की, १० कि.मी. क्षेत्र त्रिज्यमध्ये आरोग्य विषयक सर्व कामांसाठी व्यवस्थापनाने जादा रक्कमेची तरतूद करावी. माझी विनंती आहे की, आपल्याकडे पाण्याची कमतरता असल्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या पाण्याचा कमीतकमी व योग्य वापर करावा. ऊस उत्पादनासाठी प्रचंड पाण्याचा वापर केला जातो. माझी आपणास विनंती आहे की, ऊस उत्पादनासाठी कमीत कमी पाणी वापरासाठी शेतकऱ्यांना ठिबक सिंचन किंवा फवारा पध्दतीचा वापर करण्यासाठी कारखान्याने प्रोत्साहन द्यावे. माझ्या प्रस्तावाचा विचार करुन शेतकऱ्यांना सहकार्य करा. रासायनिक खतांचा वापर टाळून सेंद्रिय खताच्या वापर करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे कारण कंपोस्ट खत हे रासायनिक खतापेक्षा अधिक उपयोगी व समाजासाठी सुरक्षित आहे. कारखान्याने आकर्षक पध्दतीने वृक्षारोपन केलेले आहे. कायद्याने एकूण उद्योग क्षेत्राच्या ३३ टक्के जागेवर वृक्षारोपण करणे बंधनकारक आहे. पण तेवढे वृक्षारोपन पुरेसे नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे प्रदुषण रोखण्यासाठी ते ५० ते ६० करावे. यासाठी आणखी कळजाई लावायीत पाहिजेत. कारखान्याने आपली सामाजिक जबाबदारी पार पाडावी. खेडी, ग्रामपंचायत विकासासाठी सहकार्य करावे. भारतामध्ये स्किल डेव्हलपमेंटचे प्रमाण ५ ते ६ टक्के खूपच कमी आहे. कारखान्याने स्कील डेव्हलपमेंट कार्यक्रम राबवावा. पाण्याची साठवणूकीचा व्यवस्था करावी. दुधगंगा नदीचे पाणी योग्य प्रमाणात वापरावे. जल साठे तयार करुन त्यावेळी नदीमध्ये पुरेसे नसेल तेव्हा ते वापरावे. मी सांगितलेले उपाय राबविणे अवघड नाहीत. लोकांच्यासाठी, समाजासाठी या गोष्टी करणे आवश्यक आहे. (यावेळी श्री. न.ह. शिवांगी,

प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर यांनी श्री. रेड्डी यांना लेखी निवेदन सादर करण्यास सांगितले.

उत्तर —

यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, कारखाना त्रिज्येतील १० किमी या परिघ अभ्यास केला गेलेला आहे. तसेच त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम याचा अभ्यास केलेला आहे. भूजल परिक्षण तसेच माती परिक्षण केलेले आहे. आम्ही शेतक-यामध्ये जनजागृती करत असतो. रासायनिक खता ऐवजी कंपोस्ट खत वापरण्याबाबत तसेच पाण्याचा कमीत कमी वापर करण्याबाबत कारखान्याच्या ऊस विकास कार्यक्रमामधुन नेहमीच शेतक-यांना मार्गदर्शन केले जाते. प्रामुख्याने ऊसाच्या कुठल्या जातीची लागवड करावी, ऊसाच्या कुठल्या जातीला जास्त वजन मिळते, कुठले खते वापरावी, ड्रीप इरीगेशन करुन पाण्याची बचत कशी करावी असा प्रकारचा ऊस विकास कार्यक्रम असतो त्यामधुन ही जनजागृती होतच असते. सामाजिक जबाबदारी बद्दल सांगायचे झाले तर प्रत्येक कार्पोरेट क्षेत्र, पब्लीक, प्रायव्हेट, प्रोप्रायटरी, मल्टी नॅशनल या प्रत्येकाची जबाबदारी वेगवेगळी आहे. आमचा सहकारी क्षेत्रातील साखर कारखाना असुन त्याच्याशी निगडीत जी जबाबदारी आहे ती हा कारखाना करेल. तसेच जे लेखी निवेदन दिलेले आहे त्याबाबत कारखान्याकडुन सविस्तर लेखी उत्तर दिले जाईल.

**प्रश्न क्र. ४. श्री. विलास बाबासो खानविलकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, रेंदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

या परिसराचा, भागाचा जर विकास बघायचा झाला तर त्यावेळी कारखाना ७५०० टीसीडी क्षमतेने चालत होता त्यावेळी या भागात कसलेही प्रदुषण झाले नाही. या भागाच्या परिसराचा विचार केला तर निश्चितच १२००० टीसीडी विस्तारीकरण केले तर प्रदुषणात वाढ होणार नाही कारण व्यवस्थापनाने त्याची योग्य ती काळजी/जबाबदारी घेतलेली आहे. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्प याठिकाणी झालाच पाहिजे.

**प्रश्न क्र. ५. श्री. वसंत रामचंद्र शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, यळगुड, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

कारखान्याच्या कार्यक्षेत्राच्या पश्चिम बाजुला एक ओढा आहे आणि त्या ओढयाच्या काठावरच पिण्याच्या पाण्याची विहिर, बोअर आहे. पण प्रत्येक पावसाळयामध्ये कारखान्यातील सांडपाणी त्या ओढयाला येते. त्यामध्ये आमची पाणी दुषीत होते. त्याबद्दल काय करता येईल का ?

उत्तर :

यावेळी प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, प्रामुख्याने कारखान्यातून निघणा-या सांडपाण्यावर सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेले सांडपाणी हरित पट्ट्यासाठी वापरले जाते. आपण सांगितले जून ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या काळात सांडपाणी ओढ्यात मिसळते. या काळात कारखाना कार्यरत नसतो. हा कारखान्याचा 'ऑफ सिजन' असतो. कारखाना ऑक्टोबर महिन्यात सुरु होतो व मे मध्ये बंद करावा लागतो. खरेतर पाणी बाहेर जाण्याची शक्यता कमी आहे. पण चुकून जर अपघाताने असे झाले असेल तर कारखाना यापुढे नक्की दक्षता घेईल की एक थेंबही पाणी कारखान्याच्या बाहेर जाणार नाही.

यानंतर श्री. शिवांगी, प्रादेशिक अधिकारी यांनी उपस्थितांना जर आणखी प्रश्न, समस्या मांडायच्या असतील तर त्या मांडाव्यात तसेच जर लेखी निवेदने सादर करायची असतील तर दि. २१.०७.२०१५ पर्यंत उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर येथे सादर करावीत अशी विनंती केली. त्यानंतर श्री. शिवांगी यांनी जनसुनावणी दरम्यान मांडलेले प्रश्न व देण्यात आलेली उत्तरे थोडक्यात वाचून दाखविली व वरील झालेल्या सर्वांची इतिवृत्तामध्ये नोंद घेऊन ते म.प्र.नि. मंडळाच्या मुख्यालयामार्फत भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाकडे सी.डी. सह सादर केले जाईल असे सांगितले. तसेच सदर विस्तारीकरण प्रकल्पाला म.प्र.नि. मंडळाने अद्याप कोणतीही परवानगी दिलेली नसून भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने पर्यावरण दाखला दिल्यानंतरच आमच्याकडून परवानगी दिली जाईल असे सांगितले.

शेवटी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीच्या अध्यक्षा मा. संगिता चौगुले यांनी या जनसुनावणीमध्ये ज्या सूचना केल्या, प्रश्न विचारले आणि उत्तरे दिलेली आहेत त्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेवून ते महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनाला सादर केले जाईल असे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्षांनी जनसुनावणीस जमलेल्या सर्वांचे आभार मानून जनसुनावणी संपल्याचे जाहिर केले.

प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे श्री. सुरेश दत्तू हणवर, पळगुड यांचेकडून एक लेखी तक्रार तसेच ग्रामपंचायत, हुपरी; ग्रामपंचायत, पळगुड व ग्रामपंचायत, रेंदाळ या ग्रामपंचायतींनी प्रकल्प होण्यासाठीचे केलेले ठराव तसेच श्री. न. ह. शिवांगी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर यांनी सांगितल्याप्रमाणे श्री. डॉ. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी यांनी दिलेले लेखी निवेदन प्राप्त झाले. त्यांच्या प्रती तसेच त्यातील श्री. सुरेश दत्तू

हणबर व श्री. व्ही. सुनंदा रेड्डी यांच्या निवेदनांच्या अनुषंगाने मे. जवाहर शेतकरी सहकारी पावर कारखाना लि. यांनी सादर केलेली खुलासा पत्रांच्या प्रती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

होळकर २०.०.२०१५
(मनिष होळकर)
संयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर

(संगिता चौगुले)
अध्यक्षा
अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी,
कोल्हापूर